# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः07.12.2025** **वारःरविवार**

---

जागतिक स्तरावर, भारत उच्च विकास आणि कमी चलनवाढीचं प्रारूप म्हणून समोर येत असल्याचं पंतप्रधानांचं प्रतिपादन

विमान वाहातूक महासंचालनालयाकडून इंडिगोला कारणे दाखवा नोटीस, आज संध्याकाळअखेर भाडे परतफेड करण्याचे निर्देश

परीक्षा पे चर्चा या संवादात्मक कार्यक्रमाच्या ९व्या आवृत्तीचे जानेवारीमध्ये आयोजन

पुणे मॅराथनमध्ये भारतीय खेळाडूंचे यश

**<u>पंतप्रधानचलनवाढ</u>**

जगासाठी, सध्या भारत उच्च विकास आणि कमी चलनवाढीचं प्रारूप म्हणून उभा असल्याचं प्रतिपादन काल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. दिल्लीत एका खासगी वृत्तपत्रानं आयोजित केलेल्या कार्यक्रमात मोदी सहभागी झाले होते. वर्तमान आर्थिक वर्षाच्या दुसऱ्या तिमाहीत सकल गृह उत्पादनाचा ८ टक्के विकास दर, देशाच्या वाढत्या प्रगतीचे प्रतिबिंब असल्याचं त्यांनी अधोरेखित केलं. वैश्विक अर्थव्यवस्थेला चालना देणारा देश होत असल्याचं सांगून भारत जगासाठी उच्च विकास आणि कमी महागाईचा प्रारूप म्हणून समोर येत असल्याचं त्यांनी नमूद केलं. सध्याच्या अनिश्चिततेनं आणि आव्हानांनी ग्रस्त जगात भारताने आपली वेगळी ओळख निर्माण केल्याचं सांगत, मंदीच्या काळात भारत विकासगाथा लिहित असल्याचं ते म्हणाले. केंद्र सरकारच्या नागरीक केंद्रित दृष्टीकोनामुळे प्रशासन सुव्यवस्थित झाल्याचंही त्यांनी यावेळी सांगितलं.

**<u>शाहविकासकामे</u>**

केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शाह यांच्या हस्ते अहमदाबादमध्ये गृहनिर्माण, पायाभूत सुविधा आणि सार्वजनिक सुविधांशी निगडीत पंधराशे कोटी रुपयांच्या विविध विकास कामांचे उद्घाटन आणि पायाभरणी करण्यात येणार आहे. तसंच मिनी स्पोर्टस् कॉम्पेक्सचं भूमीपूजनही करण्यात येणार आहे.

**<u>राजनाथउद्घाटन</u>**

लडाखमधील लेह जिल्ह्यातल्या श्योक इथं संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्या हस्ते विविध पायाभूत सुविधा आणि संपर्क क्षेत्रातील प्रकल्पांचं उद्घाटन होणार आहे. रस्ते, पूल, बोगदे यांच्याशी निगडीत प्रकल्पांमुळे जम्मू आणि काश्मीर तसंच लडाखसह इतर राज्यांसह, दुर्गम गावांमधील संपर्क जाळ्यात

सुधारणा होणार आहे. पंतप्रधान कार्यालयातील राज्यमंत्री जितेंद्र सिंह देखील दूरदृश्य प्रणालीद्वारे या उद्घाटन समारंभात सहभागी होणार आहेत.

**इंडिगोप्रश्न**

विमान उड्डाण रद्द झाल्यानं प्रवाशांची गैरसोय आणि त्रास सहन करावा लागल्याच्या पार्श्वभुमीवर नागरी विमान वाहातूक महासंचालनालयाने इंडिगो कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी पीटर एल्बर्स आणि व्यवस्थापक इसिड्रो पोरकेरास यांना कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. नागरी विमान वाहातूक मंत्री के. राममोहन नायडू यांनी परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांसह एल्बर्स यांच्यासमवेत बैठक घेतली होती. नियामकाने मंजूर केलेल्या कार्यवेळ मर्यादेच्या नियमांनुसार सुधारित गरजांसाठी पुरेशी व्यवस्था न झाल्यानं हे अपयश आल्याचं महासंचालनालयानं नमूद केलं आहे.

**इंडिगो**

दरम्यान, रद्द झालेल्या उड्डाणांसाठी सर्वप्रवाशांच्या प्रवासभाड्याची परतफेड विनाविलंब करण्याचे निर्देश नागरी विमान वाहातूक मंत्रालयानं इंडिगोला काल दिले आहेत. आज रात्रीपर्यंत ही प्रक्रिया पूर्ण करण्यास सांगितलं आहे. ज्या प्रवाशांच्या प्रवास नियोजनावर याचा परिणाम झाला आहे, त्यांच्याकडून पुनर्निधारण शुल्क आकारू नये असेही निर्देश देण्यात आले आहेत. भाडे शुल्क परतफेड प्रक्रियेत विलंब केल्यास अथवा तिचे पालन न केल्यास नियामक कारवाई करण्यात येणार असल्याचंही मंत्रालयानं स्पष्ट केलं आहे. दरम्यान, विमान उड्डाणं रद्द झाल्यानंतर प्रवाश्यांच्या प्रवास मागणीत वाढ झाल्याने रेल्वे विभागानं सुलभ प्रवास आणि पुरेसा निवास व्यवस्था उपलब्ध करण्याच्या व्यापक उपाययोजना केल्या आहेत. देशातल्या सर्व भागांत पोहोचणाऱ्या रेल्वेगाड्यांमध्ये अतिरिक्त डबे जोडण्यात आल्याचं रेल्वेनं स्पष्ट केलं आहे.

**परीक्षापेचर्चा**

परीक्षेचा ताण दूर करत हा काळ जीवनाचा अविभाज्य भाग म्हणून साजरा करता येऊ शकतो हा दृष्टीकोन देणारा परीक्षा पे चर्चा या संवादात्मक कार्यक्रमाच्या ९व्या आवृत्तीचे आयोजन नव्या वर्षात जानेवारीमध्ये करण्यात येणार आहे. या माध्यमातून भारतातील तसेच परदेशातील विद्यार्थी, पालक आणि शिक्षक यांच्याशी पंतप्रधान संवाद साधतात. जानेवारी २०२६मध्ये होणाऱ्या नव्या आवृत्तीमध्ये सहभागी होण्यासाठी १ डिसेंबरपासून ११ जानेवारी २०२६ या कालावधीत माय जीओव्ही पोर्टलवर ऑनलाईन बहुपर्यायी प्रश्नमंजुषा आयोजित करण्यात आली आहे. यामध्ये सहावी ते १२वी पर्यंतचे विद्यार्थ्यांसह शिक्षक, पालक यांना सहभागी होऊ शकतील.

**न्यायकृबु**

न्यायलयीन प्रक्रियेत कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर अत्यंत सावधिगिरीनं केला जात असल्याचा निर्वाळा सर्वोच्च न्यायालयानं दिला आहे. सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्य कांत आणि न्यायमूर्ती जॉयमाल्या बागची यांच्या खंडपीठाने न्यायव्यवस्थेत कृत्रिम बुद्धिमत्ता आणि मशीन लर्निंगचे नियमन करण्याची मागणी करणाऱ्या याचिकेवर सुनावणी करताना न्यायदानावर असं तंत्रज्ञान नियंत्रण ठेवू शकणार नाही यावरही भर

दिला. न्यायव्यवस्थेत न्यायाधीशांचे स्वातंत्र्य आणि मानवी विवेक केंद्रस्थानी राहील याचा पुनरूच्चार केला. न्यायाधीशांनी अशा पैलूंची उलटतपासणी करावी यावर खंडपीठाने सहमती दर्शवली असली तरीही न्यायालयीन बाजूने याविषयी कोणतेही निर्देश देण्यास ते इच्छुक नसल्याचं स्पष्ट केलं आहे.

**पॅलेस्टीन**

पॅलेस्टाईन निर्वासितांसाठीच्या मदत आणि कार्य एजन्सीच्या कार्यकाळाचे पुढील तीन वर्षांसाठी नूतनीकरण करण्याच्या ठरावाच्या बाजूने भारताने मतदान केलं आहे. पॅलेस्टाईन निर्वासितांना मदत या विषयाअंतर्गत घेतलेल्या ठरावाला १५१ मतांनी पाठिंबा मिळाला तर १० देशांनी विरोध केला आणि १४ देश तटस्थ राहिले. या संस्थेने हमासच्या लष्करी उभारणीला मदत केल्याचं कारण देत या नूतनीकरणाला इस्रायलनं विरोध दर्शवला आहे. ठरावाविरुद्ध मतदान करणाऱ्या देशांमध्ये अमेरिका, इस्रायल, अर्जेंटिना, फिजी यांचा समावेश होता.

**भारतअमेरिकादहशतवाद**

भारत आणि अमेरिकेने सर्व प्रकारच्या दहशतवादाचा त्याच्या सर्व प्रकारच्या प्रकटीकरणाचा तीव्र निषेध केला आहे. उभय देशांदरम्यान, दहशतवादविरोधी २१वा भारत अमेरिका संयुक्त कार्यगट आणि ७वा समपदस्थ संवाद या दोन बैठका नुकत्याच पार पडल्या. यामध्ये संयुक्त राष्ट्र संघ, क्वाड आणि वित्तीय कृती कार्यदलासह जागतिक स्तरावर दहशतवादाविरोधात एकत्र काम करण्याची वचनबद्धता पुन्हा एकदा व्यक्त केली.

**अलास्काकॅनडाभूकंप**

अलास्का आणि कॅनडाच्या युकोन प्रांताच्या सीमेजवळ एका दुर्गभ भागात काल सात रिख्टर क्षमतेच्या भूकंपाच्या धक्क्याची नोंद झाली. अमेरिकेच्या भूगर्भीय सर्वेक्षणानुसार, अलास्कातील याकुटाट पासून ९१ किलोमीटरवर हा भूकंप झाला. त्यानंतरही लहान लहान धक्के बसले.

**आगोवा**

गोव्यात अर्पोरा येथील एका नाईट क्लबमध्ये काल रात्री सिलेंडर स्फोटानंतर लागलेल्या आगीत २३ जणांचा मृत्यू झाला आहे. मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी सांगितलं की, मृतांमध्ये बहुतांश क्लबचे स्वयंपाकघरातील कामगार आणि तीन ते चार पर्यटक होते. सर्व मृतदेह बाहेर काढण्यात आले असल्याची माहिती गोव्याचे पोलिस महासंचालक आलोक कुमार यांनी दिली आहे.

दरम्यान, राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गोव्यात झालेल्या जीवितहानीबद्दल दुःख व्यक्त केलं आहे. पंतप्रधानांनी गोव्याचे मुख्यमंत्री डॉक्टर प्रमोद सावंत यांच्याशी संपर्क करुन परिस्थितीबद्दल चर्चा केली. तसंच राष्ट्रीय मदत निधीतून मृतांच्या नातेवाईकांना दोन लाख तर जखमींना पन्नास हजार रुपयांची मदत जाहीर केली आहे.

**<u>मॅरॉथॉन</u>**

पुण्याची ओळख असणारी पुणे आंतरराष्ट्रीय मॅरेथॉन स्पर्धेच्या४२ किलोमीटरच्या पूर्ण मॅरेथॉनमध्ये इथोपियाचा हैमानुतआगेन्यू विजेता ठरला. तर इथोपियाचाच डेरेज्जे अलेमोउपविजेता ठरला आहे. तर लष्कराचा खेळाडू तीर्थ कुमार पून हाआंतरराष्ट्रीय गटात तिसरा तर भारतीय गटात पहिला आला. महिला गटात साक्षी जड्याळ ही महिला गटात पूर्ण मॅरेथॉनची विजेती ठरली. तर मेसेरत तुलू ही इथियोपियाची धावपटू उपविजेती ठरली. याच देशाची वारे बाँटू दिमेसे तिसऱ्या स्थानावर राहिली.

२१, किलोमीटरच्या हाफ मॅरेथॉनमध्ये महिलांच्या गटात हरियाणाची भारती सिंग विजेची तर नाशिकची रवीना गायकवाड उपविजेती ठरली. पुरुषांच्या अर्ध मॅरेथॉन स्पर्धेत भारतीय खेळाडूंचं वर्चस्व पाहायला मिळाले. सचिन यादवनं या गटात अव्वल स्थान पटकावलं. राज तिवारी आणि मुकेश कुमार अनुक्रमे दुसऱ्या आणि तिसऱ्या स्थानावर राहिले.

**<u>क्रिकेट</u>**

विशाखापट्टणम इथं दक्षिण आफ्रिकेविरुद्ध झालेल्या पन्नास षटकांच्या तिसऱ्या सामन्यात काल भारताने ९ गडी आणि १० षटके राखून दमदार विजय नोंदवत मालिका २-१ अशी जिंकली. दक्षिण आफ्रिकेने क्वीटन डीकॉकच्या शतकी खेळीच्या जोरावर २७० धावा केल्या होत्या. युवा सलामीवीर यशस्वी जयस्वालने नाबाद ११६ धावांची खेळी करत मर्यादित षटकांच्या कारकिर्दीतील पहिले शतक झळकावले. कुलदीप यादव आणि प्रसिद्ध कृष्णा यांनी प्रत्येकी ४ गडी बाद करत आफ्रिकन संघाला मोठी धावसंख्या उभारण्यापासून रोखलं. आता येत्या 9 डिसेंबर पासून वीस षटकांची ५ सामन्यांची मालिका सुरू होत असून मालिकेतील पहिला सामना कटक इथं होणार आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.